दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक १९०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार, दि.२५ जुलै २०२४ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## अनिल देशमुखांनी खोटे गुन्हे नोंदवण्यासाठी धमकावले, पोलीस अधीक्षकांचा सीबीआयला जबाब

पुणे दि.२४ (प्रतिनिधी)- अनिल देशमुख गृहमंत्री असतानाचं एक प्रकरण आता चांगलंच तापू लागलंय. गिरीश महाजनांवर गुन्हा का दाखल केला नाही असं म्हणत अनिल देशमुखांनी मला वारंवार धमकावलं, असा आरोप जळगावचे तत्कालीन पोलीस अधीक्षक प्रवीण मुंढे यांनी केला आहे. तसा जबाब त्यांनी सीबीआयकडे देखील नोंदवला आहे. विजय पाटील यांनी गिरीश महाजन यांच्याविरोधात जी तक्रार केली होती, तो कथित घटनाक्रम जळगाव जिल्ह्यातला नसून पुणे जिल्ह्यातला होता. तसं मी देशमुखांना अनेकदा सांगितलं, मात्र ते गुन्हा दाखल करण्याची जबरदस्ती करत होते, अखेर त्यांच्या दबावातून झीरो एफआयआर दाखल केला, असा दावा मुंढे यांनी केला आहे. जळगावमधील जळगाव जिल्हा विद्या प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थेचा ताबा मिळवण्यावरुन गिरीश महाजन आणि संस्थेचे संचालक नरेंद्र भास्कर पाटील यांच्यात वाद झाला. संस्थेचा ताबा मिळवण्यासाठी नरेंद्र पाटील यांचे बंधू विजय पाटील यांना गिरीश महाजन यांच्या लोकांनी २०१८ मध्ये पुण्यात डांबून ठेवले आणि चाकूचा धाक दाखवला. गिरीश महाजन यांनी त्यावेळी व्हिडिओ कॉल करून विजय पाटील यांना धमकावले असा आरोप करण्यात आला . विजय पाटील यांच्या तक्रारीनंतर २०२० मध्ये जळगाव मधील निंभोरे पोलीस ठाण्यात गिरीश महाजन यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. हा गुन्हा दाखल करण्यासाठी जळगावचे तत्कालीन पोलीस अधीक्षक प्रवीण मुंढे यांना तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी तीनवेळा फोन करून दबाव टाकल्याचा जबाब प्रवीण मुंढे यांनी आता या प्रकरणाचा तपास करणाऱ्या सी बी आय ला दिला आहे.

# उद्धव ठाकरे, अजित पवारांना तुरुंगात डांबण्याचा कट होता

## पण अनिल देशमुखांनी नकार देत तुरुंगात जाणे पसंत केले, श्याम मानव यांच्या दाव्याने खळबळ

नागपूर दि.२४ (प्रतिनिधी)- तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार यांना खोट्या प्रकरणांत तुरुंगात डांबण्याचा डाव होता. पण तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी यासंबंधीच्या एका प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करण्यास नकार दिल्यामुळे हे दोघे वाचले. नंतर या प्रकरणांत देशमुखांवरच तुरुंगात जाण्याची वेळ आली, असा खळबळजनक दावा अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. श्याम मानव यांनी केलेल्या आरोपाचा रोष उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अंगुली निर्देश करीत असल्याचे दिसून येत आहे.

श्याम मानव पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, ईडीच्या कारवाईपासून वाचण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुखांपुढे एक ऑफर ठेवण्यात आली होती. या ऑफरनुसार उद्धव ठाकरे, अजित पवार, आदित्य ठाकरे व अनिल परब यांना तुरुंगात डांबण्यात येणार होते. पण देशमुखांनी असे करण्यास ठाम नकार दिला. त्यांनी त्यासंबंधीच्या प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. यामुळे हे नेते वाचले, पण देशमुखांवरच तब्बल १३ महिने तुरुंगात जाण्याची वेळ आली.

महाविकास आघाडीची सत्ता गेल्यानंतर महायुतीची सत्ता आली. त्यानंतर ल गेचच या लोकांनी आपली नखे बाहेर काढली. ती नखे आता आपल्याला ओळखता आली पाहिजेत. संजय राऊत यांच्याविरोधात आतापर्यंत काही सिद्ध झाले आहे का? असे श्याम मानव म्हणाले.

ते पुढे बोलताना म्हणाले की, तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याकडे तेव्हा सातत्याने तुमच्याकडे पाठवण्यात आलेल्या ४ प्रतिज्ञापत्रांवर स्वाक्षरी करण्याचे निरोप जात होते. (पान ४ वर)

### श्याम माधव फडणवीसांवरील आरोपावर ठाम

माझ्या अनुभवानुसार एखाद्या व्यक्तीने कुठली गोष्ट सांगितली, तर कुठले पुरावे पहावे, त्यावर किती विश्वास ठेवावा, हे मला माहित आहे. मी खोटे बोलत नाही. तसेच हे मी पहिल्यांदा बोललेलो देखील नाही. लोकसभा निवडणुकीच्या काळात देखील मी हेच बोलत होतो. त्यामुळे मला कोणीतरी सुपारी दिली आणि त्यानंतर मी असे बोलेले, असे देवेंद्र फडणवीस यांना म्हणायचे आहे का? मला कोण विकत घेऊ शकतो का? किंबहुना विकत घेण्याची क्षमता ही देवेंद्र फडणवीस यांच्यामध्येच चांगली असल्याची बोचरी टीका श्याम मानव यांनी केली आहे. श्याम मानव यांनी केलेल्या टीकेवर देवेंद्र फडणवीस यांनी पलटवार केला होता. त्याला आता श्याम मानव यांनीही प्रत्युत्तर दिले आहे.

या संदर्भात श्याम माधव म्हणाले की, मी इमर्जन्सीमध्ये इंदिरा गांधींचा विरोध केला होता. त्या वेळी संघाचे लोक तसेच देवेंद्र फडणवीस यांचे वडील गंगाधर फडणवीस यांच्या सोबतही मी काम केले आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या बद्दल मी विचार करूनच बोललो आहे. मी जे बोललो त्यावर मी ठाम आहे. मी गेल्या लोकसभेत जनजागृती केलीय, आता विधानसभेत ही जनजागृती करणार असल्याचे श्याम मानव यांनी सांगितले. देवेंद्र फडणवीस यांना भेटणे एवढे सोपे आहे का? असा प्रतिप्रश्न श्याम माधव यांनी केला आहे. आरोपानंतर देवेंद्र फडणवीस यांनी श्याम माधव यांनी आधी मला विचारायला हवे होते. अशी प्रतिक्रिया दिली होती. त्यावर माधव यांनी हा प्रश्न उपस्थित केला आहे. फडणवीस यांना भेटण्यासाठी मला मागील तीन वर्षे मला तासंतास वाट पाहावी लागली असल्याची टीका त्यांनी केली. अनिल देशमुख यांच्याकडे असलेल्या पुराव्याबद्दल मला खात्री असल्यानेच मी सरकारवर गंभीर आरोप केली असल्याचेही श्याम मानव यांनी म्हटले आहे.

### श्याम मानव सुपारीबाजांच्या नादी लागलेत-फडणवीस

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- राज्यात माझ्यावर टीका करण्यासाठी काही सुपारीबाज तयार झाले असून ते सुपारी घेऊन आपल्यावर आरोप करतात, श्याम मानव हे त्यांच्या नादी लागलेत का हे पाहावं लागेल, असा खोचक टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी लगावला. तर अनिल देशमुख यांच्या कारनाम्याचे ऑडिओ आणि व्हिडिओ पुरावे माझ्याकडे आहेत, त्यामुळे माझे एकच सांगणे आहे की, मी कुणाच्या नादी लागत नाही आणि लागलो तर त्यांना सोडत नाही, असा थेट इशारा फडणवीस यांनी माजी मंत्री अनिल देशमुख यांना दिला.

फडणवीस म्हणाले की, श्याम मानव मला इतके वर्षे ओळखतात, आरोप करण्यापूर्वी त्यांनी मला एकदा विचारायला हवं होतं. अलि कडच्या काळात अनेक सुपारीबाज तयार झाले आहेत. सुपारी घेऊन आरोप करणे हे त्यांचं काम आहे. त्या सुपारीबाजांच्या नादाला श्याम मानव लागले तर नाही ना, हे एकदा पाहावं ल ागेल. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अनिल देशमुखांनी या आधीही आपल्यावर आरोप केले होते. मी आधी यावर बोललो नव्हतो. मी अशा प्रकारचं राजकारण कधीही करत नाही. मी कुणाच्या नादी लागत नाही आणि कुणी नादी लागलं तर सोडत नाही. मला देशमुखांना एकच सांगायचं आहे, त्यांच्याच पक्षाच्या काही नेत्यांनी माझ्याकडे काही ऑडिओ व्हिज्युअल्स दिलेत. त्यामध्ये अनिल देशमुख शरद पवार, उद्धव ठाकरे, सचिन वाझे यांच्याबद्दल काय म्हणत आहेत हे दिसतंय. रोज कुणी माझ्यावर आरोप करत असेल तर मी शांत बसणार नाही. वेळ आली तर त्या गोष्टी मला पब्लिक कराव्या लागतील. देवेंद्र फडणवीस पुराव्याशिवाय काही बोलत नाही, असा इशाराही त्यांनी देशमुख यांना दिला.

# मला कारागृहात टाकण्याचे दरेकर, फडणवीस यांचे अभियान

## मनोज जरांगे यांचे उपोषण स्थगित

जालना दि.२४ (प्रतिनिधी)- पुणे येथील प्रकरणात मी कोणाची फसवणूक केली नाही. त्यानंतर मला जेलमध्ये टाकण्यात येणार आहे. दरकेर आणि देवेंद्र फडणवीस यांचे हे अभियान आहे. मला गोळ्या घालून मारण्यात येईल. मी मरण्यास तयार आहे. मी मोठे झाल्यामुळे माझ्यावर केस टाकली. परंतु मला कारागृहात पाठवले तर भाजपचे एक सीट निवडून येऊ द्यायचे नाही. त्यांनी मला जेलमध्ये मारले तर तुम्ही जिवंत आहे तो पर्यंत भाजपला निवडून येऊ देऊ नका, असे मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

मनोज जरांगे-पाटील यांच्याविरोधात पुणे न्यायाल याने अटक वॉरंट काढले आहे. पुण्यातील नाट्यनिर्मात्याची फसवणूक केल्या प्रकरणात दाखल खटल्यात मनोज जरांगे-पाटील हजर राहिले नाही. त्यामुळे हे वॉरंट काढले आहे. त्यामुळे मनोज जरांगे यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्ला चढवला. फडणवीस, दरेकर ही भाजपला लागलेली कीड आहे. त्याचा चांगलाच फटका भाजपला बसणार आहे. मला थोडे नीट होऊ द्या मग मी पाहतो. दरेकर म्हणजे तमाशातील मावशी आहे. तिचा आवाज मंजुळ आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक समुद्रात करणार होते. परंतु त्यांनी एक वीट उभी केली नाही, अशी टीका त्यांनी केली.

दरम्यान मराठा आरक्षणाच्या (पान ४ वर)

### जरांगेंच्या अटक वॉरंटमध्ये माझा काय संबंध-फडणवीस

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे यांनी केलेल्या टीकेवर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मनोज जरांगे गेल्या वेळी माझ्या आईवर बोलले होते. नंतर त्यांनी माफी मागितली. उपोषणामुळे त्यांना त्रास झाला होता, त्यामुळे तसं वक्तव्य झालं असं ते म्हणाले होते. आताही उपोषणामुळे पुन्हा त्यांचा संताप झाला असेल. त्यामुळे त्यांनी अशी वक्तव्य केली असतील, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाली.

मनोज जरांगे यांच्याविरोधात निघालेल्या अटक वॉरंटमध्ये राज्य सरकारचा काही संबंध नसल्याचं देवेंद्र फडणवीस म्हणाले. मनोज जरांगेंची केस आहे ती २०१३ सालची आहे. या पूर्वीदेखील त्यांच्या विरोधात नॉन बेलेबल वॉरंट काढण्यात आला होता. पण ते हजर राहिल्यानंतर ते रद्द झाला. आता पुन्हा ते तारखेला गेले नाहीत, त्यामुळे त्यांच्याविरोधात वॉरंट निघालं. ते तारखेवर हजर राहिले तर वॉरंट रद्द होतात. आमच्यावरही असे अनेक वॉरंट निघाले आहेत. अटक वॉरंट निघालं आणि त्यावर कोर्टात हजर राहिलं तर ते वॉरंट नंतर रद्द होतात, त्यामुळे त्यांनी माझ्यावर आरोप करण्याचे काहीही कारण नाही.

## तुम्हाला तुमच्या भाषेत उत्तर देऊ-लाड

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- तुमच्यावर कुणी गुन्हा दाखल केला तर त्यातही फडणवीसांचा दाखला देत असाल तर ते बोलणे योग्य नाही. त्या प्रकरणाशी फडणवीसांचा संबंध नाही. फडणवीस आणि दरेकरांसाठी वापरलेली भाषा सहन करणार नाही. आमच्यावर संस्कार आहेत, तुम्ही शिव्या देऊनही मी शिव्या दिल्या नाही. पण हे तुम्ही सुरूच ठेवाल तर आम्हालाही त्याच भाषेत बोल वे लागेल. मनोज जरांगे निजामशाहीकडे मोगलाईकडे जात आहेत. त्यांनी लाडकी बहीण योजनेला विरोध केला. त्यांना महिलांचे चाल णारं घर बंद करायचे आहे का ? महाविकास आघाडीचे ऐकून तुम्ही हे करताय का ? लहान भावाला जर सरकार पैसे देत असेल, दोन कोटी मराठ्यांना त्याचा फायदा होत असेल तर त्याचा त्रास तुम्हाला आहे का ? त्यांनी २८८ उमेदवार उभे करावेत, विधिमंडळात येऊन आरक्षणासाठी आमच्या साथीने लढाई करावी. ते जी भाषा बोलत आहेत, त्यातून शरद पवार यांच्या पाठीशी असल्याचा वास येत असल्याचे लाड यांनी म्हटले.

भाजप आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे यांच्या हल्ल्यास उत्तर दिले. ते म्हणाले की, आमचे बंधू मनोजदादा यांनी दरेकरांवर शिवराळ भाषेत टीका केली. त्यांनी आज सगळ्या सीमा पार केल्या.

मनोजदादांना सांगू इच्छितो, जर पडायचे आहे तर त्यांनीही २८८ उमेदवार उभे करा, आम्हीही बघू कसे पाडता. प्रत्येकाचे रक्त लाल असते. आम्ही मराठे आहोत का त्याचे सर्टिफिकेट आम्हाला तुमच्याकडून नको आहे. आम्ही तुमच्या सत्य परिस्थितीवर बोललो तर तुम्हाला तोंड दाखवायला जागा राहणार नाही.

## किमान आधारभूत किमतीच्या कायदेशीर हमीसाठी मोदी सरकारवर दबाव आणू, राहुल गांधींचे शेतकऱ्यांना आश्वासन!

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- किमान आधारभूत किमतीला कायदेशीर हमी देण्यासाठी विरोधक म्हणून आम्ही सरकारवर दबाव आणू असं आश्वासन लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शेतकऱ्यांना दिले आहे. राहुल गांधी यांनी आज दिल्लीत किसान मजदूर मोर्चा आणि संयुक्त किसान मोर्चा यांच्या नेतृत्वाखाली १२ शेतकरी नेत्यांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आम्ही काँग्रेस पक्षाच्या जाहीरनाम्यात किमान आधारभूत किंमतीच्या कायदेशीर हमीचा उल्लेख केला होता. आम्ही यासंदर्भात अभ्यास केला आहे. त्यामुळे किमान आधारभूत किमतींसाठी कायदेशीर हमी लागू केली जाऊ शकते, हे मी ठामपणे सांगू शकतो, असं राहुल गांधी म्हणाले. यासंदर्भात आम्ही लवकरच इंडिया आघाडीच्या नेत्याची बैठक घेणार असून या बैठकीत शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत चर्चा केली जाईल. त्यानंतर आम्ही एमएसपीच्या कायदेशीर हमीसाठी सरकारवर दबाव आणू अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

दरम्यान, या बैठकीपूर्वी शेतकऱ्यांना संसदेत प्रवेश न दिल्याने चांगलाच गोंधळ उडाल्याचं बघायला मिळालं. यावरून राहुल गांधी यांनी मोदी सरकावर जोरदार टीका केली. मोदी सरकार आम्हाला शेतकऱ्यांना भेटू देत नाही, असा आरोपही राहुल गांधी यांनी यावेळी केला. आम्ही काही शेतकऱ्यांना भेटण्यासाठी संसदेत बोलवलं होतं. मात्र, त्यांना आत प्रवेश दिला जात नाही. ते शेतकरी असल्याने त्यांना संसदेत येऊ देत नसावे, अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

## श्रीमंत मराठे म्हणजे शरद पवार, अजित पवारांचा पक्ष-प्रकाश आंबेडकर

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाचा मुद्दा सध्या राज्यात चर्चेत आहे. मनोज जरांगेंनी आजच उपोषण सोडलं आहे, आपण आता विधानसभेची तयारी करणार असे संकेत जरांगेंनी दिले आहेत. तर दुसरीकडे लक्ष्मण हाकेंनी ओबीसी समाजासाठी आंदोलन सुरु केलं आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय नेत्यांच्या यात्रा लवकरच सुरु होणार आहेत. अशात प्रकाश आंबेडकर यांनी श्रीमंत मराठे म्हणजे शरद पवार, अजित पवारांचा पक्ष असं म्हटलं आहे.

महाराष्ट्रात सध्या ओबीसी आणि मराठा आरक्षणावरुन हे दोन समाज आमने-सामने आले असून त्यावरून गावागावात आणि नेत्यांमध्येही जातीय तणाव पाहायला मिळत आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरुन समाजात जातीय संघर्ष वाढत असल्याने राज्यात सलोखा निर्माण व्हावा आणि आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी वंचित आरक्षण बचाव यात्रा काढली जात असल्याचं सांगण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर (पान ४ वर)

## केंद्र आणि राज्यात भाजपचे सरकार:मग मराठा, धनगर आरक्षणाचा प्रश्न का सोडवत नाही; खा. प्रणिती शिंदेंचा संसदेत सवाल



नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- राज्यामध्ये आणि केंद्रात भाजप सरकार आहे. मग महाराष्ट्रात सुरू असलेल्या मराठा आणि धनगर आरक्षणाच्या प्रश्नावर त्वरीत तोडगा का काढला जात नाही, असा सवाल सोलापुरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी संसदेत उपस्थित केला. तर मुळात राज्यात आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकार तणाव निर्माण करत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला.

खा. प्रणिती शिंदे म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला आरक्षणाचा अधिकार दिलेला आहे. त्यातून मागासवर्गीयातील लोकांना पुढे येण्यास मोठी मदत झालेली आहे. एकीकडे राज्यात आणि केंद्रामध्ये भाजप सरकार असतानाही देखील मराठा व धनगर आरक्षणाच्या प्रश्नावर त्वरीत कोणताही तोडगा का काढला जात नाही. राज्यात मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील हे उपोषणाला बसलेले आहेत. तर धनगर समाज हा एसटी प्रवर्गात येण्यासाठी मागणी करत आहे. परंतु, महाराष्ट्रातील सरकार हा मुद्दा झुलवत ठेवत आहे. केंद्रात सरकार असल्यामुळे यावर तरी त्वरीत निर्णय होईल, अशी अपेक्षा माझी आहे, यावर चर्चा झाली पाहिजे, अशी मागणी प्रणिती शिंदे यांनी केली.

पुढे बोलताना प्रणित शिंदे यांनी राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीमध्ये जातनिहाय जनगणनेची घोषणा केली होती. त्याची आठवण करून देत खासदार प्रणिती शिंदे यांनी जातनिहाय जनगणना करण्याची मागणी केली. तसेच महिला आरक्षणाची देखील अंमलबजावणी केली जावी, अशी मागणी त्यांनी केली.

## नेपाळमध्ये विमान कोसळले, १८ जणांचा मृत्यू

काठमांडू दि.२४ (वृत्तसंस्था)- नेपाळची राजधानी काठमांडू येथे विमान कोसळले आहे. विमानातील १९ जणांपैकी १८ जणांचा मृत्यू झाला आहे. जखमी पायलट कॅप्टन मनीष शाक्य यांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हे विमान काठमांडूहून पोखराला जात होते.

सकाळी ११ वाजता त्रिभुवन विमानतळावरून विमानाने उड्डाण केले. काही क्षणातच ते कोसळले. ९एन-एएमई हे विमान सूर्या एअरलाइन्सचे होते. अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांपैकी १७ जण सूर्या एअरलाइन्सचे कर्मचारी होते, तर उर्वरित २ क्रू मेंबर्स होते.

काठमांडू पोस्टनुसार, अपघातानंतर लगेचच पोल ीस आणि अग्निशमन दलाचे पथक बचाव कार्यासाठी घटनास्थळी पोहोचले. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, एका सुरक्षा अधिकाऱ्याने सांगितले की, अपघातानंतर विमानाला आग लागली. ते लगेचच विझवण्यात आले. मात्र हा अपघात नेमका कशामुळे झाला याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

## विधानसभा एकीने लढण्यासाठी मविआ समन्वय समिती स्थापनार

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- शरद पवार यांच्या निवासस्थानी महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची चर्चा झाली आहे. यामुळे लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीत देखील महाविकास आघाडीने आघाडी घेतली आहे. इतकेच नाही तर काही जागांबाबत अंतिम निर्णय देखील झाला असल्याची माहिती समोर आली आहे. महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांची एक समन्वय समिती तयार करून या समितीच्या माध्यमातून चर्चा करायला सुरुवात होणार आहे.

या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार महाविकास आघाडीतील विद्यमान आमदारांच्या पहिल्या जागा त्या-त्या पक्षांना वाटल्या जातील. त्यानंतर सत्ताधारी पक्षांच्या मतदार संघांमध्ये महाविकास आघाडीमधील ज्या पक्षाची जास्त ताकद असेल, त्या पक्षाला ती जागा सोडली जाणार आहे. या सूत्रानुसार लवकरात लवकर जागांची चाचपणी करायला सुरुवात करण्याचे आदेश पदाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

मविआचे शिल्पकार शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या निवासस्थानी नुकतीच एक बैठक झाली आहे. या बैठकीत संपूर्ण जागावाटप कसे होणार, हे स्पष्ट झाले नसले तरी काही जागांबाबत अंतिम निर्णय झाला आहे. प्राथमिक जागावाटपासाठी नेत्यांनी सूत्र निश्चित केले आहे. त्यानुसार आता मविआमधील जागा वाटप होणार आहे.

दरम्यान आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी समन्वय समितीची स्थापना करणार आहे. या समन्वय समितीच्या माध्यमातून निवडणुकीच्या तोंडावर महत्वाचे निर्णय घेतले जाणार आहेत. तसेच तिन्ही पक्षात समन्वयाची जबाबदारी सांभाळणार आहे. या समन्वय समितीमध्ये काँग्रेसकडून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि विधिमंडळ पक्ष नेते बाळासाहेब थोरात यांचा समावेश करण्यात आला आहे. काल (२३ जुलै) दिल्लीत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांच्या निवासस्थानी झालेल्या महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांच्या बैठकीत हा निर्णय झाला आहे.

## अमित शहांच्या मार्गदर्शनानंतर भाजपचे कार्यकर्ते सक्रिय

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- पुणे येथे झालेल्या भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश अधिवेशनानंतर आता भाजपाच्या संघटनात्मक ७८ जिल्ह्यांमध्ये २,३ आणि ४ ऑगस्ट दरम्यान जिल्हा अधिवेशने आणि विस्तारित कार्यकारिणी बैठका होणार असून, पक्षाच्या मंडल रचनेतील सर्व ७७८ मंडलांमध्ये ९,१० आणि ११ ऑगस्ट दरम्यान अधिवेशने आणि बैठका होतील अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी बुधवारी दिली.

भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते. जिल्हा आणि मंडल स्तरावरील अधिवेशनांचे नियोजन आणि तयारी करण्यासाठी तसेच कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी भाजपाचे वरिष्ठ नेते २५,२६ आणि २७ जुलैत विभागवार प्रवास करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# विश्वासपूर्तीचा अर्थसंकल्प

**केंद्रीय** अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पावरून प्रतिक्रिया आल्या. विरोधकांकडून अर्थसंकल्पावर टीका करण्यात आली, तर एनडीएकडून अर्थसंकल्पाचे स्वागत झाले. बिहार, आंध्र प्रदेशसाठी मोठ्या निधीसह विविध योजनांची घोषणा करण्यात आली. यावरून इंडिया आघाडीने टीकास्त्र सोडले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज आपला सलग सातवा अर्थसंकल्प सादर केला. अर्थसंकल्प म्हणजे सरकारचा आगामी वर्षासाठीचा रोड मॅप असतो आणि भावी योजना आणि पुढील काळासाठी सरकार काय करणार याचा लेखाजोखा. या अर्थसंकल्पात नव्या करदात्यांसाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या. यानुसार, नव्या करप्रणालीत तीन लाख रुपये उत्पन्नावर कोणताही कर नसेल. ३ ते ७ लाख रुपयांपर्यंत ५ टक्के, ७ ते १० लाख रुपयांपर्यंत १० टक्के, १० ते १२ लाख रुपयांपर्यंत १५ टक्के, तर १२ ते १५ लाख रुपयांपर्यंत २० टक्के कर असेल. या नव्या करप्रणाली स्वीकार करणाऱ्या करदात्यांचा १७,५०० रुपयांचा फायदा होईल. प्रमाणित वजावटीची मर्याद वाढवून ती ५० हजारांवरून ७५ हजार रुपये करण्यात आली आहे. पेन्शनची मर्यादाही वाढवून ती १५ हजारांवरून २५ हजार रुपये करण्यात आली. याचा लाभ देशातील ४ कोटी पेन्शनधारक आणि पगारदार वर्गाला होईल असा दावा सीतारामन यांनी केला. केंद्र सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात एंजेल टॅक्स हटवला आहे. सीतारामन म्हणाल्या की, देशातील दोन तृतीयांश करदात्यांनी नवीन करप्रणालीचा स्वीकार केला आहे.

सोने-चांदीवरील कस्टम ड्युटी बदलली आहे. सोने-चांदीसाठी सहा टक्के, तर प्लॅटिनमसाठी ६.५ टक्के कस्टम ड्युटी कमी करण्यात आली. तीन महत्त्वाच्या औषधांना एक्साईज ड्युटीमधून वगळण्यात आले. त्याशिवाय मोबाइल फोनची निर्यात वाढल्याच्या पार्श्वभूमीवर मोबाइल उद्योग वाढला. मोबाइल चार्जर आणि इतर वस्तूंवरील अधिभार १५ टक्क्यांनी कमी केला आहे. अपेक्षेप्रमाणे या अर्थसंकल्पात बिहार, आंध्र प्रदेशसाठी महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या. मोदी यांना बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि आंध्र प्रदेशने चांगली साथ दिल्याने त्या राज्यांवर चांगल्या घोषणांचा पाऊस पाडला. बिहारमधील रस्त्यांसाठी जादा निधी देण्यात आला असून राज्यात तीन मोठे एक्स्प्रेसवेही सुरू होणार आहेत.

पाटणा, पूर्णिया एक्स्प्रेस वे त्यातीलच एक भाग आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात युवकांना डोळ्यांसमोर ठेवून त्यांच्यासाठी केंद्र सरकारने देशातील बेरोजगारी कमी करण्याची योजना आणली. त्यानुसार ४ कोटी तरुणांना रोजगार देण्यात येणार असून केंद्र सरकारने त्यांच्यासाठी नियोजनबद्ध योजना आखली. काही वर्षांपासून बेरोजगारीने उच्चांक गाठल्याने युवकांसाठी सरकार काय देणार याची सर्वांना प्रचंड उत्सुकता होती. त्याचे उत्तर निर्मला सीतारामन यांनी दिले. ४.१ कोटी तरुणांना रोजगार देण्याची ही योजना असून पाच वर्षांसाठी ही योजना आहे. यासाठी अर्थमंत्र्यांनी दोन लाख कोटी रुपयांची तरतूद केली. तसेच नागरिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी कौशल्य विकसित करण्यासाठी सरकारने १.४८ कोटी प्रस्तावित केले. पाच वर्षांच्या काळात वीस लाख तरुणांना प्रशिक्षित केले जाईल. एकूण १००० औद्योगिक प्रशिक्षण संस्था अपग्रेड केल्या जातील. सरकार ५ वर्षांत तरुणांना इंटर्नशिपची संधी देणार आहे. अपेक्षेप्रमाणे हा अर्थसंकल्प महिला, युवक, शेतकऱ्यांना डोळ्यांसमोर ठेवून केला गेलेला अर्थसंकल्प असेल याची पुरेपूर पूर्तता मोदी ३.० सरकारने केली आहे. शिक्षण, रोजगार आणि कोशल्य विकासासाठी अर्थसंकल्पात १.४८ कोटी रुपयांची तरतूद केली असून महिला, युवक, शेतकऱ्यांना पुढे घेऊन जाणारा हा प्रागतिक अर्थसंकल्प आहे अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली.

देशातील सर्वोच्च कंपन्यांमध्ये युवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. ज्यातून युवकांना दरमहा पाच हजार रुपये मासिक भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान आवास योजनेतून शहरातील गरीब, दुर्बल घटकांसाठी स्वतःची घरे देतात. अर्थमंत्री सीतारामन यांनी महत्त्वाच्या घोषणा करतानाच मोफत रेशनव्यवस्थेचीही घोषणा केली आहे. पुढील पाच वर्षांसाठी मोफत रेशन धान्य योजना सुरू राहील. यासह कृषी आणि संबंधित क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद, रोजगार निर्मितीसह तीन योजनांवर सरकार काम करणार, विद्यार्थ्यांना ७.५ लाख रुपयांचे स्किल मोडेल मोफत देणार अशा अनेक योजनांचा त्यात समावेश आहे. ३० लाख तरुणांना प्रशिक्षण मिळणार, युवकांना शिक्षणासाठी असुरक्षित शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. मुद्रा योजनेंतर्गत कर्जाची मर्यादा वाढवून ती दहा लाखांऐवजी वीस लाख रुपये केली आहे. विद्यार्थ्यांसाठी आता दहा लाख रुपयांचे कर्ज उपलब्ध होणार आहे.

सीतारामन यांनी तरुणांची आवड जपली आहे. त्यानुसार मोबाइल, चार्जर स्वस्त होणार आहे. आंध्र प्रदेश, बिहार या राज्यांना झुकते माप देण्यात आल्यामुळे विरोधकांनी टीका करण्यास सुरुवात केली आहे. राज्यातील महाविकास आघाडीचे नेते विजय वडेट्टीवार यांनी महाराष्ट्राला या अर्थसंकल्पातून काय मिळाले अशी टीका केली. पण त्यांच्या हे लक्षात आणून द्यायला हवे की या अर्थसंकल्पात देशाचा विचार असतो. एखाद्या राज्याचा असत नाही.

बिहार,आंध्र प्रदेश राज्यांवर लोकप्रिय घोषणांची खैरात करण्यात आली. पण त्यावरूनही विरोधकांनी टीका सुरू केली. पण जेव्हा काँग्रेसचे सरकार होते तेव्हा त्यांना पाठिंबा देणाऱ्या राज्यांवर तर सवलतींची खैरात केली जायची. हे विरोधक साफ विसरून गेले. २०२४-२५चा अर्थसंकल्प सादर करताना बिहारमध्ये मोठे मेडिकल कॉलेज, नवीन विमानतळ, क्रीडा पायाभूत सुविधांची घोषणा करण्यात आली. आंध्र प्रदेशला विशेष पॅकेजची भेट मिळाली. यावरूनही विरोधकांची पोटदुखी सुरू आहे.

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी पंतप्रधान मोदी यांना पाठिंबा दिला म्हणून त्यांना इतक्या सवलती दिल्या असा आरोप विरोधकांनी केला पण तो सर्वथा गैरलागू आहे. कारण काँग्रेसनेही हेच केले होते.

# मराठवाड्यात का वाढतेय गुन्हेगारी?

**आज** नागरिकांना सुखाची झोप लागत नाही. कधी कुठे काय होईल, याचा नेम नाही. पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था कशी अबाधित राहील, यावर लक्ष केंद्रित करावे. आज समस्त मराठवाडावासीय पोलिसांच्या विश्वासावर आहेत. पॅरोलवर सुटलेले, हिस्ट्रिशिटर गुन्हेगार, पूर्वीच्या अनेक गुन्ह्यांत हवे असलेले आरोपी यांना पकडणे व त्यांच्या टोळ्या शोधून काढणेही तेवढेच गरजेचे आहे. शहरात दररोज दिवसा-ढवळ्या होणारे गुन्हे काही आपोआप होत नाहीत, त्यांना चालविणारे म्होरके शोधा, सापडल्यावर त्यांना खरा पोलिसी हिसका दाखवा, म्हणजे मराठवाड्यातील नागरिक सुखाचा श्वास घेतील, हे मात्र नक्की.

मराठवाड्यात अलीकडच्या काळात गुन्हेगारीने पुन्हा तोंड वर काढले आहे. गोळीबार, खून, दरोडे, चोऱ्या हे प्रकार मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात होत आहेत. असे प्रकार व गुन्हेगारी थांबणार नसली तरी या प्रकरणात होणारी वाढ चिंतेची बाब ठरत आहे. पोलिसांचा वचक कमी झाल्यामुळे गुन्हेगारांनी तोंड वर काढले आहे, हे सत्य नाकारून चालणार नाही.

मराठवाड्यातील नांदेड शहरातील ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन दिवसांत खुनाच्या तीन घटना घडल्या. नांदेडमधील बिलाल नगर परिसरात दारू पिण्याच्या किरकोळ वादातून एकाचा खून करण्यात आला. त्यानंतर रहिमपूर या भागात अनैतिक संबंधातून एकाची, तर बळीरामपूर येथे पूर्व वैमनस्यातून एका तरुणाचा खून करण्यात आला. विशेष म्हणजे केवळ ४८ तासांत एकाच पोलीस स्थानक हद्दीत लागोपाठ तीन खून झाल्याने नांदेड शहरात कमालीची दहशत पसरली आहे. हिंगोली जिल्ह्यात असलेल्या औंढा नागनाथ तालुक्यात असोला या गावात सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास ग्रामपंचायत कार्यालयाजवळ एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने गोळीबार केला. फिर्यादी नागोराव पावडे यांनी औंढा नागनाथ युवासेना तालुका युवा अधिकारी बालाजी नागरे यास मागील सहा दिवसांपासून शिवीगाळ का करत आहेस? अशी विचारणा केली त्यावरून दोघांमध्ये वाद सुरू झाला. यावेळी मारुती पावडे हे मध्ये पडलेले असताना त्यांच्यावर बालाजी नागरे याने गोळीबार केला. यामध्ये मारुती यांच्या पोटात गोळी लागल्याने ते गंभीर जखमी झाले. यावेळी नागोराव पावडे यांनी गंभीर जखमी झालेल्या मारुती यांना उचलून नेण्याचा प्रयत्न केला असता विशाल नागरे यांनी त्यांच्यावर चाकूने वार करून त्यांनाही जखमी केले. यापूर्वीही मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात तसेच नांदेड जिल्ह्यातही नेहमीच गोळीबाराच्या घटना घडलेल्या आहेत. बंदुकी व गोळीबार या नित्याच्याच बाबी झालेल्या आहेत. परभणीत १९ वर्षीय युवकाचा खून झाल्याने चांगलीच खळबळ उडाली.




रात्रीच्या वेळी १९ वर्षीय युवकास घरातून बाहेर बोलावून घेत त्यास मारहाण केली. या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी रात्री ७ ते ९ वाजेच्या दरम्यान शहरातील कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रोशनीनगर भागात घडली. या प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेत खून झालेल्या युवकाचे नाव शाहरूख हुसेन पठाण (१९. रा. रोशनीनगर, परभणी) असे आहे, तर शेख गौस, शैजादीबी शेख, मुन्नू शेख, वहिदाबी शेख (सर्वजण रा. रोशनीनगर, परभणी) अशी आरोपींची नावे आहेत. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यात भेंडेवाडी येथे घराबाहेर अंगणात झोपलेल्या एका ८० वर्षीय वृद्ध महिलेला चोरट्यांनी चाकूने जबर मारहाण करत महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत पळवली. लक्ष्मीबाई मुंजाजी असे त्या वृद्ध महिलेचे नाव आहे. असे प्रकारही मराठवाड्यात सर्वच जिल्ह्यांत वाढले आहेत.

नागरिकांना घराबाहेर पडल्यावर सही सलामात घरी येऊ की नाही याची देखील शाश्वती नाही. ग्रामीण भागात अंगणात व आखाड्यात ग्रामस्थांना झोपावे लागते; परंतु त्या ठिकाणी देखील ते सुरक्षित नसल्याचे अलीकडच्या घटनांवरून दिसून येत आहे. बीड जिल्ह्यातही असेच काहीसे चित्र आहे. संपूर्ण बीड जिल्ह्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातलेला आहे. दररोज चोरीच्या घटना होत असल्याने नागरिकांमध्ये दहशत आहे. चोरटे सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह नगदी रक्कम, मोटारसायकल, मोबाइल चोरी करत आहेत; परंतु आता चोरट्यांनी जनावरे चोरण्याचे सत्र सुरू केले आहे. बीडमध्ये मोकाट जनावरांच्या चोरीच्या घटना वाढल्या आहेत. ग्रामीण भागात गोठ्यात बांधलेली जनावरे सर्रासपणे चोरीला जाऊ लागली आहेत. चराटा येथील चार बैल आणि दोन गाई चोरट्यांनी चोरून नेल्या. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ग्रामीण भागात चोरीच्या घटना वाढल्याने सर्वसामान्य नागरिक कमालीचे बिथरले आहेत. बीड शहरातील बार्शी रोडवरील ॲक्सिस बँकेचे एटीएम मध्यरात्री २ च्या सुमारास चोरट्यांकडून फोडण्याचा प्रयत्न झाला. त्या ठिकाणी दगडाच्या सहाय्याने एटीएम फोडण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या चोरट्याला पोलिसांनी पकडले.

या प्रकरणात पेंडगाव येथील अक्षय दिलीप गायकवाड या चोरट्यास पकडण्यात पोलिसांना यश आले. धाराशिव जिल्ह्यात, तर आठवडी बाजारात दुचाकी घेऊन जाणेही अवघड होऊन बसले आहे. धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा येथे सोनार गल्लीत भरलेल्या आठवडी बाजारातून सतीश गायकवाड यांची एम.एच. २५ ए. ए. ८११४ ही हिरो स्प्लेंडर प्लस मोटरसायकल दिवसाढवळ्या चोरट्यांनी लांबवली. गोठ्यात बांधलेल्या जनावरांच्या चोरीपासून गोळीबार, खून असे प्रकार संपूर्ण मराठवाड्यात वाढले आहेत. म्हणजेच छोट्या चोऱ्या व खून या मोठ्या घटनाही नित्याच्याच होऊन बसल्या आहेत. संपूर्ण मराठवाड्यातच गुन्हेगारीमध्ये वाढ झाल्याने एक मोठी चिंता नागरिकांना सतावत आहे.

मराठवाड्यात कायदा व सुव्यवस्था सुधारा अन्यथा हाहाकार माजेल असेच म्हणण्याची वेळ आली आहे. मराठवाड्यात अलीकडच्या काळात वाढलेल्या गुन्हेगारीमुळे पोलिसांचा वचक शिल्लक आहे की नाही, यावर विचार करण्याची वेळ आली आहे. अलीकडे वाढलेल्या गुन्हेगारी घटनांमुळे सर्वत्र दहशत व भीती पसरली आहे. पोलीसवाले आहेत, आपल्याला काहीही फिकीर नाही, असे आपण पूर्वी बोलत व ऐकत असू; परंतु आता समाजात तसे दिवस राहिलेले नाहीत. गुन्हेगारी प्रचंड वाढली आहे. चोऱ्या, दरोडे, धमकावणे, मारामारी करणे हे तर नित्याचेच व रोजचेच होऊन बसले आहे; परंतु यापेक्षा भयानक म्हणजे खुलेआम-दिवसाढवळ्या खुनाचे प्रकार घडत आहेत. एकमेकांचा जीव घेणे खूपच सोपे होऊन बसले आहे. अगदी क्षुल्लक-क्षुल्लक कारणावरून एकमेकांचे जीव घेतले जात आहेत. जीव खूपच सोपा व स्वस्त होऊन बसला आहे.

एक काळ असा होता की, पोलीस स्थानकाचे प्रमुखच लोकांना, समाजाला धाकामध्ये ठेवत असत; परंतु आता तर मोठमोठ्या अधिकाऱ्यांनाही समाजाला धाकामध्ये ठेवण्याची शक्ती शिल्लक राहिलेली नाही. काही घटनांमध्ये गुन्हा घडल्यानंतर लगेच आरोपी सापडत आहेत. अनेकदा पोलीस अधीक्षकांच्या हाताखाली काम करणारे अधिकारी म्हणावा तेवढा धाक ठेवत नाहीत की काय? अशी शंका घेण्यास वाव आहे. एलसीबी, डीबी, गुप्तचर यंत्रणा सक्षम असणे गरजेचे आहे. आजच्या घडीला सकाळी मॉर्निंग वॉकला गेलेली स्त्री, घरातून ज्या दागिन्यावर गेली तशीच घरी परतणार की नाही? याची भीती असते.

सध्या गळ्यातील मंगळसूत्र, सोन्याची चैन हिसकावून पळणारेही मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी करत आहेत. फक्त टीम लिडर खमक्या असून चालत नाही, त्यांचे सोबती व इतर अधिकारी व कर्मचारीही तेवढेच तत्पर असणे गरजेचे आहे. सध्या नांदेड शहर एज्युकेशनल हब बनले आहे.

राजस्थानमधील कोटा शहराची जी अवस्था आहे, अगदी तशीच किंवा त्यापेक्षा थोडी कमी अवस्था नांदेड शहराची बनली आहे. कोचिंग क्लासेसच्या निमित्ताने राज्यातून अनेक आई-वडील आपल्या मुला-मुलींचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी दोन-तीन वर्षांसाठी नांदेडला स्थायिक होत आहेत. यासाठी नांदेडला घर किंवा फ्लॅट भाड्याने घेऊन ते डॉक्टर-इंजिनीअर घडविण्याचे प्रयत्न करीत आहेत. अशा परिस्थितीत त्या कुटुंबीयांना किंवा त्यांच्या पाल्यांना टारगट मुलांकडून किंवा एखाद्या गल्ली बोळ्यातील 'दादांकडून' घाबरून राहावे लागत आहे. दररोज हाणामारीच्या घटना घडत आहेत. यावर अंकुश ठेवण्याचे काम कोणाचे आहे? कायदा व सुव्यवस्था आहे की नाही? असा प्रश्न उपस्थित करायला नक्कीच वाव आहे. पोलिसांनी कठोरपणे स्वतःचे कर्तव्य पार पाडावे. त्यांना देखील त्यांच्या वरिष्ठांचे सहकार्य मिळणे तेवढेच गरजेचे आहे. लोकसंख्या वाढलेली आहे. त्या प्रमाणात पोलीस स्थानकात अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या देखील वाढवणे गरजेचे आहे. प्रत्येकाला स्वतःचा जीव प्रिय आहे.

स्वतःचे कुटुंबीय प्रिय आहे; परंतु हे सर्व विचारात घेताना पोलिसांनी जी नोकरी स्वीकारली आहे, अगोदर त्याचा विचार करणेही तेवढेच गरजेचे आहे. पोलीस खात्यात नोकरी स्वीकारत असताना जी शपथ घ्यावी लागते, त्याचा विचार पोलिसांनी करावा. आज बिनदिक्कतपणे दुचाकीवर ट्रीपल सिट फिरणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. कुठे आहे पोलिसांचा धाक अन् कुठे आहे वाहतूक शाखा.

मराठवाड्याचा इतिहास पाहा, पूर्वी काम करणारे अधिकारी व ठाणेप्रमुख पाहा, ते कसे काम करायचे. किमान त्यांच्यासारखे काम करता येत नसेल तर कमीत कमी समाजावर तसेच गुन्हेगारांवर पोलिसांचा धाक असणे गरजेचे आहे. पोलिसांनी त्यांच्या धाकावरच समाजावर नियंत्रण ठेवावे, हे खूप गरजेचे आहे.

**- अभयकुमार दांडगे**

# पाणी आणि आपले आरोग्य.....

**पाणी** म्हणजे जीवन मानलं जातं. शरीराला अत्यंत आवश्यक असा हा घटक आहे. मात्र गरज नसताना पाणी प्यायल्यामुळे किंवा चुकीच्या वेळेस पाणी प्यायल्याने त्याचा उपयोग होण्याऐवजी दुष्परिणाम होण्याची शक्यता जास्त असते. म्हणूनच पाणी पिताना काही गोष्टींची, विशेषत: पाणी कधी पिऊ नये याची खबरदारी घेणं गरजेचं आहे.

निरोगी जीवनासाठी योग्य आहारविहाराच्या बरोबरीने, योग्य प्रमाणात पाणी पिणंही आवश्यक असतं. मात्र बरेचजण एक चूक अगदी सर्रास करताना दिसतात आणि ती म्हणजे, अमूक लिटर, अमूक इतके ग्लास पाणी दिवसभरात संपवलंच पाहिजे हा विचित्र नियम पाळणं.

शिवाय हा नियम पाळताना चुकीच्या वेळात पाणी पितच रहाणं सुद्धा अपायकारक आहे. पाणी शरीरासाठी अत्यंत आवश्यक आहेच. मात्र ते पिताना काही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. किती पाणी प्यावं याचबरोबर ते कधी प्यावं हेदेखील लक्षात घ्यायला हवं.

आपलं शरीर म्हणजे एक चमत्कारिक यंत्रच आहे. त्याच्या गरजा ते योग्यवेळी व्यक्त करतं आणि तितकीच ती भागवतंही. भूक लागल्या शिवाय जेवू नये आणि तहान लागल्याशिवाय पाणी पिऊ नये. अनेकजण उगाचंच तहान लागलेली नसली तरीही सतत पाणी पितच राहतात. हे शरीराच्या रचनेविरूध्द आहे. मात्र याचा अर्थ असा नाही की घशाला कोरड पडेपर्यंत वाट बघावी.

चुकीच्या वेळी पाणी पिणं आणि पाण्याच्या अतीसेवनानं शरीरातल्या मिठाचं अर्थात सोडीयमचं संतुलन बिघडतं. याला Hyponatremia असं म्हणतात. यामुळे कधी कधी गंभीर समस्या उद्भवू शकतात.

**झोपण्यापूर्वी...**

अनेकांना झोपण्यापूर्वी पाणी, ग्रीन टी, चहा, कॉफी असं काहीतरी



पिण्याची सवय असते. मात्र झोपण्यापूर्वी किमान अर्धा तास तरी पोटात कुठलाही द्रवपदार्थ जाऊ देऊ नये. झोपण्यापूर्वी पाणी प्यायल्यानं झोपेत व्यत्यय येतो. जास्त वेळा लघवीला जाण्याच्या शक्यता निर्माण होतात. म्हणूनच झोपण्यापूर्वी अर्धा तास पोट रिकामं असावं. यामुळे झोपही शांत लागते. दिवसाच्या तुलनेत रात्री आपल्या किडण्या मंदपणे काम करत असतात. याच कारणामुळे सकाळी उठल्यावर बरेचदा चेहरा सुजलेला दिसतो. त्यात जर झोपण्यापूर्वी पाणी प्यायलं तर ही सूज वाढण्याची शक्यता असते.

**व्यायाम करत असताना...**

तज्ज्ञांच्यामते व्यायामाच्या दरम्यान पाणी प्यायल्यानं त्याचे दुष्परिणाम होण्याची शक्यता बळावते. व्यायाम करत असताना शरीराचं तापमान वाढलेलं असतं. यावेळेस जर थंड पाणी जास्त प्रमाणात प्यायलं तर electrolyte depletion ची शक्यता असते. याची लक्षणं म्हणजे, डोकं दुखणे, मळमळ, थकवा जाणवणे. शक्यतो व्यायाम झाल्यावरच पाणी प्यावे आणि व्यायामा दरम्यान तहान लागलीच तर दरम्यान भरपूर पाणी न पिता घोट घोट पाणी प्यावे.

**लघवीला रंग नसेल एक...**

आपण योग्य प्रमाणात पाणी पित आहोत की नाही? याची सोपी टेस्ट म्हणजे, लघवीचा रंग तपासणे. जर तो फिका पिवळट असेल तर आपण योग्य प्रमाणात पाणी पित आहोत.

जर लघवीला रंगच नसेल आणि ती पाण्यासारखीच पारदर्शक असेल, तर मात्र पाण्याचं अतिरिक्त सेवन होत आहे. अर्थात हे सातत्याने होणं योग्य नाही. असं होत असेल, तर पाणी कमी प्यावं. पाण्याच्या अतिसेवनामुळे सोडियमची कमतरता जाणवू लागते आणि कधी कधी हृदविकाराचा झटका येण्याची शक्यताही असते.

**सकाळी रिकाम्यापोटी**

अनेकांचा असा समज असतो की सकाळी उठल्यावर अनुशापोटी म्हणजे पोट रिकामं असताना भरपूर पाणी प्यावं. हे अगदी चूक आहे. रिकाम्या पोटी जास्तीत जास्त एक लिटरपर्यंत पाणी प्यावं. अनुशापोटी पाणी पिणं लाभकारक असलं तरीही लिटरच्या लिटर पाणी पिणं असा त्याचा अर्थ नाही. तसेच गार पाण्याऐवजी कोमट पाणी प्यायलं तर आरोग्याच्या दृष्टिनं ते जास्त लाभकारक ठरेल.

**- डॉ. प्रमोद जाधव**

**- सुनील इनामदार**

# आनंदलहरी भाग-१२

**जैसा भ्रमर भेदी कोडें । भलतैसें काष्ठ कोरडें ।**
**परीं कळिकेमाजीं सांपडे । कोंवळिये ॥**

मोह माणसाला उच्च पातळीवरुन नको त्या स्तरापर्यन्त कसे आणतो याचे स्पष्टीकरण माऊली करीत आहेत. मोहामध्ये माणूस स्वत:चे अस्तित्व विसरुन जातो. अस्तित्वच काय, स्वत:चे सर्वस्व हरुन जातो. मोह हे एक असे शस्त्र आहे की ते समोरच्यावर वार न करता स्वत:वर वार करण्यास भाग पाडते. अर्जुन युध्द करण्याच्या मानसिकतेने रणभुमीवर उतरला आहे. कोणाशी युध्द करावे लागणार आहे याचे त्याला पूर्वीच ज्ञान होते. असे असतांनाही प्रत्यक्ष रणभूमीत उतरल्यानंतर शत्रुपक्षाला पाहून अर्जुनाला मोह निर्माण व्हावा हे आश्चर्य वाटण्यासारखे आहे. मानवी जीवनातही असे अनेक प्रसंग घडत असतात, पण याचे माणसाला आश्चर्य वाटत नाही हे विशेष. माणसाला वाटते की, मी केलेले योग्यच आहे. पत्नी, पती, पुत्र किंवा ईतर जे कोणी असतील त्यांच्या प्रेमापोटी माणूस मोहग्रस्त होतो व हातून नको ते घडत आहे हे त्याला मोहाच्या पडद्याने दिसत नाही. मात्र एके दिवशी त्याचे विपरित परिणाम भोगण्याची वेळ त्याच्यावर येते. मी मी म्हणणारा माणूस कारणवश मोहग्रस्त झाला तर स्वत:चे अस्तित्व संपल्याचेही त्याला भान कसे राहात नाही याची अनेक उदाहरणे आपण पाहातो. मोह माणसाचा सर्वनाश कसे करतो याचे सुंदर स्पष्टीकरण माऊलींनी केले आहे. भ्रमर कठीणातले कठीण लाकूड सहज कोरु शकतो. पण कमळाच्या गाभ्यात बसुन कमळाचा स्वाद घेतांना कमळ मिटत असल्याचे विसरतो. त्या कमळाला पोखरुन बाहेर पडावे असेही त्याला वाटत नाही आणि कमळाच्या गाभ्यात तो अडकून पडतो. त्यात त्याचे सर्वस्व संपते.



माऊलींची ही ओवी आम्हाला भरपूर काही देऊन जाते. मी-मी म्हणणारे लोक किंवा समाजात ज्यांनी लौकिक मिळविला आहे, असे महान व्यक्तीमत्व असलेले मान्यवर सुध्दा बऱ्याच वेळा मोहग्रस्त होऊन स्वत:चे अस्तित्व लयास घेऊन गेलेले आपण पाहातो. समाजाचा आदर्श किंवा आशास्थान असणाऱ्या माणसांकडून जेव्हा मोहग्रस्त होऊन बेधुंद वागण्याच्या घटना घडतात तेव्हा समाजाला मोठा धक्का बसतो. मोठया माणसांच्या मोहग्रस्त होऊन वागण्याचा धक्का समाजाला बसत असेल. पण आपल्या सारख्या सामान्य माणसाच्या मोहापोटी बेधुंद वागण्याने किमान आपल्या संसाराला, आपल्या अस्तित्वाला तरी धक्का बसत असेल, याचा विचार आपण का करु नये ? आपण सुध्दा समाजाचे एक घटक आहोत म्हणून आपण मोहग्रस्त होऊन वागलो तर त्याचा विपरित परिणाम आपल्याबरोबर समाजावरही होतो याचा विचार करायला हवा. स्वत:वर व समाजावर विपरित परिणाम करण्याचा अधिकार कोणालाही नाही याची जाणीव सर्वांना राहावी अशी अपेक्षा माऊलींच्या या ओवी संदर्भाने केली तर योग्य होईल. मनुष्य देहाची महती आपणाला कळली तर चुकीचे पाऊल पडण्याचे कारणच नाही. आपले योग्य पाऊल नेहमी वाढत्या आनंदलहरीकडे नेणारे ठरु शकते. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**९४२२२१६४४८**

# अब्दुल सत्तार छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पालकमंत्री पद कोणाकडे भाजपा व शिवसेनेत रस्सीखेच सुरू होती. अखेर आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संदिपान भुमारे यांचा राजीनामा आल्यानंतर लगेच अल्पसंख्याक विकासमंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे पालकमंत्री पदाची धुरा दिल्याने चर्चेला विराम मिळाला आहे. काही



दिवसांपूर्वीच औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बँक येथे आयोजित पत्रकार परिषदेत अब्दुल सत्तार यांनी पालकमंत्रीपदाची इच्छा व्यक्त केली होती. आज ती पूर्ण झाली.

औरंगाबादच्या इतिहासात पहिल्यांदाच मुस्लिम आमदाराकडे पालकमंत्रीपद मिळाले आहे म्हणून त्यांच्यावर सोशल मीडियावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सध्या अब्दुल सत्तार हे मुंबईत आहे. त्यांना पालकमंत्री पद मिळाल्याने शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# देवगिरी किल्ल्यावर आज स्वराज्य प्रेरणा दिन

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- दौलताबादच्या देवगिरी किल्ल्यावर स्वराज्य प्रेरणा दिन साजरा करण्यात येणार असून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात शहरातून विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी होतील. यामुळे दौलताबाद मार्गावर वाहतूकीची कोंडी टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी गुरुवारी (२५ जुलै) सकाळी ९ वाजेपासून कार्यक्रम संपेपर्यंत नगरनाका ते दौलताबाद टी पॉईंट ते दौलताबाद घाट हा मार्ग मद्यम व जड वाहनांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे निरीक्षक अशोक भंडारे यांनी सांगितले. या दरम्यान नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**असे असतील पर्यायी मार्ग**

* दौलताबाद टी पॉईंट ते माळीवाडा, फातियाबाद, जांभाळा गाव, कसाबखेडा, वेरुळ मार्गे पुढे जातील व येतील. * दौलताबाद टी ते माळीवाडा, सोलापुर-धुळे महामार्गे पुढे जातील व येतील. * धुळे, नाशिककडे जाणारी वाहने नगरनाका मार्गे ए. एस. क्लब, सोलापुर धुळे महामार्ग तसेच साजापुर, करोडी, करोडी, शरणापुर फाटा, दौलताबाद टी, माळीवाडा मार्गे पुढे जातील व येतील.

# उत्तम काशीनाथ वैद्य यांचे निधन



वैजापूर दि.२४ (प्रतिनिधी)- येथील पंचायत समितीचे सेवा निवृत्त सहाय्यक प्रशासन अधिकारी उत्तम काशिनाथ पा. वैद्य यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज बुधवार (ता.२४) रोजी येथील अमर धाम मध्ये अंतिम संस्कार करण्यात आले. देवाज्ञे समयी त्यांचे वय ६९वर्ष होते,त्यांच्या मागे पत्नी व तीन विवाहित मुली आहेत. पेन्शनर्स संघटनेच्या वतीने धोंडीरामसिंह राजपूत यांनी त्याना श्रद्धांजली अर्पण केली, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर मध्ये सहायक लेखाधिकारी असलेले एस.के.वैद्य यांचे ते मोठे बंधू होतं.

(पान १ वरुन)

## उद्धव ठाकरे, अजित पवारांना...

यापैकी १ प्रतिज्ञापत्र उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर बोलावले आणि दरमहा १०० कोटी गोळा करून द्या असे आदेश देणारे होते. दुसरे प्रतिज्ञापत्र उद्धव ठाकरे यांचा मुलगा आदित्य ठाकरे यांनी दिशा सालियान नामक तरुणीवर अत्याचार करून खून केल्याचे होते.

तिसरे प्रतिज्ञापत्र अनिल परब यांच्या कथित गैरव्यवहारांवर स्वाक्षरी करण्यासंबंधीचे होते. तर शेवटचे चौथे प्रतिज्ञापत्र तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुटखा व्यावसायिकांकडून पैसे गोळा करून देण्यासंबंधीचे होते. अनिल देशमुख यांनी खूप विचार केल्यानंतर समोरच्या व्यक्तीची ही ऑफर नाकारली. त्यांनी या प्रतिज्ञापत्रांवर स्वाक्षरी करण्यास साफ नकार दिला. यामुळे त्यांनाच १३ महिने तुरुंगात जावे लागले. पण कोर्टाने त्यांना क्लीनचिट दिली, असे श्याम मानव यांनी म्हटले आहे. पत्रकारांनी यावेळी त्यांना ही प्रतिज्ञापत्रे कुणी पाठवली? असा प्रश्न केला. पण त्यांनी त्या व्यक्तीचे नाव सांगण्यास नकार दिला.

## मला कारागृहात टाकण्याचे...

प्रश्नावर मनोज जरांगे पाटील यांनी जालन्यातील अंतरवाली सराटीत सुरू केलेले आमरण उपोषण स्थगित केले आहे. नारायणगडाचे मठाधिपती आणि गावातील महिल ांच्याहस्ते त्यांनी उपोषण सोडलं आहे. ज्यूस पिऊन त्यांनी हे उपोषण सोडले असून तब्येत ढासळल्याने आमरण उपोषण स्थगित केल्याचे सांगण्यात आले आहे. त्यांना गावकऱ्यांनी आणि समर्थकांनी उपोषण मागे घेण्याचा आग्रह धरला होता. दरम्यान, आज सकाळीच तब्येत ढासळल्याने मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेत असल्याची माहिती माध्यमांशी बोल ताना दिली होती.

सरकार आमरण उपोषण शक्तीला घाबरत आणि त्यांच्या सत्तेच्या खुर्चीला घाबरतात मला उपोषण करू द्या म्हणून मी गावकऱ्यांना म्हणत होतो. रात्री गावकऱ्यांनी ऐकलं नाही त्यांनी मला सलाईन लावले. सलाईन वर पडू न राहण्यात उपयोग नाही, त्यापेक्षा उपोषण न केलेलं बरं या मतावर मी आलो आहे. तिथे पडून राहण्यापेक्षा मी मतदार संघाची तयारी करेल असेही जरांगे पुढे म्हणालेत.

## श्रीमंत मराठे म्हणजे शरद पवार,..

यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली.

'महाराष्ट्रात ओबीसी आणि मराठा हे दोन समाज एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. मात्र, अशावेळेस राजकीय पक्ष आणि नेत्यांनी कोणतीही भूमिका घेतलेली नाही. हे पक्ष जातींचे पक्ष आहेत, श्रीमंत मराठे म्हणजे शरद पवार पक्ष,कॉंग्रेस आणि अजित पवार यांचा पक्ष असे आहेत. तर कायस्थ प्रभूंचे पक्ष म्हणजे भाजपा आणि शिवसेना उबाठा यांचा पक्ष आहे. यामुळेच आम्ही आता गुरुवारपासून आरक्षण बचाव यात्रा काढत आहोत. चैत्यभूमीवरुन ही यात्रा सुरु होईल, मग पुण्यात फुले वाडा, नंतर अनेक जिल्हे करत पुढे औरंगाबाद येथे ७ ऑगस्ट रोजी यात्रेची सांगता होईल', अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली.

**लवाद, नगर रचना योजना क्र. ०१ वैजापूर जिल्हा : छत्रपती संभाजीनगर यांजकडून**
**(कार्यालयाचा पत्ता: वैजापुर नगर परिषद, वैजापूर)**
**नगर रचना योजना क. ०१ वैजापूर (प्राथमिक व अंतिम)**

## जाहीर सूचना

महाराष्ट्र नगर रचना योजना नियम, १९७४ च्या नियम क्र.१३ अन्वये:

क्रमांक : लवाद/न.र.यो.क्र. ०१/वैजापूर.

प्रारूप नगर रचना योजना क्र. ०१ वैजापूर ही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६८ च्या पोटकलम (२) अन्वये मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्र. टिपीएस/वैजापूर न.र.यो./मंजूरी/कलम ६८ (२)/टिपीव्ही-५/७९२ब, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२४ अन्वये मंजूर केलेली आहे. उक्त अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एकं छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणीमध्ये गुरुवार ते बुधवार दि.१५-२१ फेब्रुवारी, २०२४ रोजी पृष्ठ क्र. १७७ व १७८ वर प्रसिद्ध झालेली आहे.

उपरिनिर्दिष्ट नगर रचना योजनेतील सर्व संबंधितांना या सूचनेद्वारे जाहीर करण्यात येते की. मा, संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्र. टिपीएस/वैजापूर न.र.यो. लवाद / कलम ७२(१)/टिपीव्ही-५/१५६९. दि.११ मार्च, २०२४ अन्वये निम्नस्वाक्षरीकार यांची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ७२ मधील तरतुदीप्रमाणे मंजूर प्रारूप नगर रचना योजना क्र.०१ वैजापूर साठी लवाद म्हणून नियुक्ती केली असून ती महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी मध्ये दि.१३-१९ जून, २०२४ च्या पृष्ठ क्र.८३५ व ८३६ वर प्रसिद्ध झालेली आहे.

म्हणून महाराष्ट्र नगर रचना योजना नियम, १९७४ च्या नियम क्र.१३ प्रमाणे या सूचनेद्वारे मी सु.ल.कमठाणे, निम्नस्वाक्षरीकार जाहीर करतो की, नगर रचना योजना क्र.०१ वैजापूर करिता लवाद म्हणून दि.१३ जून, २०२४ पासून कर्तव्ये पार पाडण्याचे काम सुरु केले आहे.

या नगर रचना योजनेत समाविष्ट झालेल्या सर्व जमीन धारकांना उक्त मंजूर प्रारूप नगर रचना योजनेच्या प्रस्तावा संबंधी सूचना किंवा हरकती सादर करण्यासाठी योग्य वेळी नमुना क्र. ४ मध्ये विशेष नोटीस बजाविण्यात येईल.

जे जमीन धारक किंवा नगर रचना योजनेत समाविष्ट झालेल्या जागांमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्ती, उक्त नगर रचना योजना तयार केल्यामुळे अपायकारक रित्या बाधित झाले असतील आणि त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाच्या कलम १०२ प्रमाणे नुकसान भरपाई देय असेल त्यांनी निम्नस्वाक्षरीकार यांचेकडे ही जाहीर सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे मुदतीत त्यांची मागणी सादर करणे आवश्यक राहील.

तसेच याद्वारे जाहीर करण्यात येते की, उक्त मंजूर प्रारूप नगर रचना योजना अंतिम करण्यासंदर्भात अधिनियमाच्या कलम ७२ मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करताना योजनेची प्रथमतः प्राथमिक नगर रचना योजना आणि अंतिम नगर रचना योजना याप्रमाणे उपविभागणी करून तद्नंतर पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येऊन शासन मान्यतेस्तव नगर रचना योजना सादर करण्यात येणार आहे.

ठिकाण: वैजापूर.
दिनांक: १९.०६.२०२४

**स्वाक्षरीत/ -**
**(सु.ल.कमठाणे)**
**नगर रचना योजना क्र. ०१ वैजापूर**
**तथा निवृत्त उपसंचालक, नगररचना.**

**By the Arbitrator, Town Planning Scheme No.01, Vaijapur, Dist. Chh.Sambhajinagar**
**(Office Address: Vaijapur Muncipal Council, Vaijapur.)**
**Town Planning Scheme No.01 Vaijapur (Preliminary & Final)**

## Public Notice

**Under Rule No 13 of the Maharashtra Town Planning Rules, 1974,**
**No. ARB/TPS-1/Vaijapur**

The Draft Town Planning Scheme No.1 Vaijapur has been sanctioned by the Hon. Director, Town Planning & Valuation Department, Maharashtra State, Pune under sub- section (2) of Section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 vide Notification No TPS-Vaijapur/Sanction/Section 68(2)/TPV-5/792B-dated 02nd February, 2024. The notification has been published in the Maharashtra Government Gazette Part-1 Chhatrapati Sambhajinagar Divisional Supplement, dated 15-21 February, 2024 on pages 177 and 178.

All concerned from the above mentioned Town Planning Scheme, it brought to notice that, the Hon. Director, Town Planning & Valuation Department, Maharashtra State, Pune has appointed undersigned as the Arbitrator for the said sanctioned Draft Town Planning Scheme vide Notification No. TPS-Vaijapur/Arbitrator/Section 72(1)/TPV-5/1569, dated 11" March, 2024 under sub-section (1) of Section 72 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. This Notification has been published in the Maharashtra Government Gazette Part-1 Chhatrapati Sambhajinagar Divisional Supplement, dated 13-19 June, 2024 on pages 835 and 836.

I, the undersigned, therefore, in accordance with Rule No.13 of the Maharashtra Town Planning Rules, 1974 declare by this Notice that, I have commenced the duties as an Arbitrator for Town Planning Scheme No 1, Vaijapur from 13 th June, 2024.

All the owners of the land included in this Town Planning Scheme will be served with Special Notice in Form No.4 to submit their suggestions and objections in respect of the proposals of the sanctioned draft Town Planning Scheme in due course.

Those owners or interested persons of the lands included in the Town Planning Scheme No.1, Vaijapur who have been injuriously affected by making of this scheme are hereby informed that they shall be entitled to make a claim of compensation as per Section 102 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 before the undersigned within a period of 60 days from the date of appearing this Notice in the Maharashtra Government Gazette.

Also it is brought to the notice that, as per Section 72 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 the sanctioned Draft Town Planning Scheme and will be firstly subdivided into Preliminary Town Planning Scheme and Final Town Planning Scheme and will be submitted to the State Government for sanction after following the due procedure as per statutory provisions.

Place : Vaijapur.
Date: 19.06.2024

Sd/-
**(S.L.Kamthane)**
Arbitrator,
Planning Scheme No.1 Vaijapur
And Ex. Deputy Director of Town Planning

# वैजापूर नगर परिषद कार्यालय

दूरध्वनी क्र. ०२४३६-२२२०३६ ई-मेल आयडी- npvaijapur@gmail.com

जा.क्र.प.वि.नि/रा.ना.ऊ.अ/कावि/२०२४ दि.२४/०७/२०२४

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर नगरपरिषद मधील पथविक्रेत्यांच्या सदस्य पदाची निवडणूक सन २०२४-२८**

## जाहिर सुचना

**पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियम) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियम) अधिनियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत आठ (८) पथविक्रेता सदस्यांच्या निवडणूक सन २०२४ कार्यक्रमाबाबत.**

## निवडणूक सुचना

ज्या अर्थी पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियम) अधिनियम २०१४ अंतर्गत नियम १४ (२) अंतर्गत आठ (८) नगर पथविक्रेता समिती सदस्य निवडणुकीसाठी कामगार आयुक्त राज्य मुंबई यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून त्यांचे पत्र के.का.आ./ओ.सं./प/वि.जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर आदेश /२०२४ /कावि/१९/७५५२ /दि २९ जून २०२४ अन्वये माझी नियुक्ती म्हणून वैजापूर नगर पथविक्रेता समिती सदस्याची निवडणूक घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून करण्यात आलेली आहे. म्हणून मी श्री. भागवत बिधोत निवडणूक निर्णय अधिकारी उपरोक्त पथविक्रेत्यांना कळवित आहे की पथविक्रेता विनियम अधिनियम २०१४ अंतर्गत १४ (२) अंतर्गत ८ नगरपथविक्रेता सदस्यांची पंचवार्षिक निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेणे करीता खालील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करीत आहे.

निवडणूक खाली दर्शविलेल्या पथविक्रेत्यांच्या समिती सदस्यांच्या आठ (८) जागेकरिता घेण्यात येईल.

**अनुसूची**

| अ.क्र. | गटाचे नाव | पदसंख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण प्रवर्गाकरिता | ३ | पथविक्रेता उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियम अधिनियम २०१४ अंतर्गत नियम ११ (२) (ख-एक) अन्वये |
| २ | अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता (महिला) | १ | |
| ३ | अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता | १ | |
| ४ | इतर मागास वर्ग प्रवर्गाकरिता (महिला) | १ | |
| ५ | अल्पसंख्यांक प्रवर्गाकरिता (महिला) | १ | |
| ६ | विकलांग / दिव्यांग प्रवर्गाकरिता | १ | |
| | एकूण | ८ | |

**निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | विवरण | दिवस व दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र देणे व स्विकारणे | गुरुवार दि.०१/०८/२०२४ ते बुधवार ०७/०८/२०२४ | स.११:०० ते दु.३:०० पर्यंत | निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी वैजापूर नगर परिषद जिल्हा छत्रपती संभाजीनगर दुरध्वनी क्र.०२४३६-२२२०३६ npvaijapur@gmail.com यांचे कार्यालय |
| २ | प्राप्त नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्ध करणे | बुधवार ०७/०८/२०२४ | दुपारी ३:०० वाजता | |
| ३ | छाननी व वैध नामनिर्देशीत उमेदवाराची यादी प्रसिद्ध करणे. | गुरुवार दि.०८/०८/२०२४ | सकाळी ११:०० वा.पासून | |
| ४ | उमेदवारी मागे घेणे | सोमवार दि.१२/०८/२०२४ | दुपारी ३:०० वाजेपर्यंत | |
| ५ | चिन्ह वाटप | मंगळवार दि.१३/०८/२०२४ | सकाळी ११:०० वाजता | |
| ६ | निवडणूक लढविनाऱ्या उमेदवाराची यादी प्रसिद्ध करणे | मंगळवार दि.१३/०८/२०२४ | दुपारी ३:०० वाजता | |
| ७ | मतदान दिनांक | मंगळवार दि.२०/०८/२०२४ | सकाळी ९:०० ते सायं.५:०० वा | |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करणे | बुधवार दि.२१/०८/२०२४ | सकाळी ९:०० | |

**१) वैजापूर नगपरिषद शहर फेरीवाला निवडणूक लढविण्याकरिता उमेदवारी पात्रता खालीलप्रमाणे असेल.**

* उमेदवारांचे नाव पथविक्रेत्यांच्या अंतिम मतदार यादीमध्ये असणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे फेरीवाला नोंदणी बाबतची मुळ पोहोच पावती आवश्यक आहे. त्याची साक्षांकित प्रत नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक राहील.
* उमेदवाराच्या नावे वैजापूर नगरपरिषेकडील कोणत्याही प्रकारची थकबाकी नसावी.
* उमेदवाराच्या नावे वैजापूर नगरपरिषदेकडील मिळकत कर / पाणी पट्टी थकबाकी ना हरकत दाखला असणे आवश्यक आहे.
* उमेदवार आरक्षित संवर्गातून निवडणूक लढवित असल्यास त्याच्याकडे त्या संवर्गातील जातीचा दाखला, विकलांग / दिव्यांग दाखला, अल्पसंख्यांक दाखला/ जातीचा दाखला असणे आवश्यक आहे.
* उमेदवाराने नगरविकास विभाग यांचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ क्रमांक ११६ बुधवार ३, आगस्ट २०१६ च्या राजपत्रातील अर्जासोबत नमूद घोषणपत्र दाखल करणे आवश्यक आहे.
* उमेदवाराच्या पात्रतेबाबत इतर कोणताही मुद्दा उपस्थित झाल्यास सार्वत्रिक निवडणूकीमध्ये नमूद असलेले नियम लागु होतील तसेच महाराष्ट्र शासन भाग चार-अ मधील मुद्दा क्र. १६ (२) मध्ये पथ विक्रेत्यास जर तो (एक) नैतिक अधःपाताचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधासाठी सिद्ध दोषी असेल किंवा (दोन) नगर पथ विक्रेता समितीचा सदस्य म्हणून त्याची कर्तव्य पार पाडण्याकरिता शारीरिकदृष्ट्या किंवा मानसिकदृष्ट्या अक्षम असेल, तर नगर पथ विक्रेता समितीमध्ये निवडून येण्यास अनर्ह ठरविण्यात येईल.

(२) नामनिर्देशन पत्र विनामुल्य पुरविण्यात येईल, अंतिम मतदार यादी वैजापूर नगरपरिषद कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

(३) नामनिर्देशन पत्र दाखल करताना त्यासोबत उमेदवारांना अनामत रक्कम रुपये २०००/- जमा करावी लागेल व १/६ मतापेक्षा कमी मते मिळाल्यास अनामत रक्कम जप्त होईल.

४) पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियम) अधिनियम २०१४ अंतर्गत उमेदवार अपात्र नसावा.

५) अनुसूचित जाती तथा अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता नामनिर्देशन पत्र सादर करताना त्यांच्या जाती जमातींचे सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेला जातीच्या दाखल्याची साक्षांकित सत्य प्रत नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे अनिवार्य राहील.

६) नामनिर्देशन पत्र स्वतः उमेदवार किंवा त्याचे सुचक व अनुमोदक यांनी व्यक्तिशः जमा करणे बंधनकारक राहील.

७) नामनिर्देशन पत्रावर मतदार यादीमध्ये ज्याचे नाव सामाविष्ट आहे अशा मतदारांपैकी एक सुचक आणि अनुमोदक यांचे नाव आणि त्यांची सही असणे अनिवार्य आहे.

८) मतदानाला येताना पथविक्रेता मतदारांनी मा. निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले फोटो असलेले ओळखपत्र तसेच पॅन कार्ड, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन, मतदान कार्ड, व बँक पासबुक, यापैकी कोणतेही एक ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील अन्यथा मतदान प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.

९) निवडणूक कार्यक्रमामध्ये तांत्रिक अडचणीमुळे फेरबदल करण्याचे अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे राहील.

१०) निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अनुपस्थित सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी निवडणूकीचे कामकाज पार पाडतील.

तरी सर्व पथविक्रेत्यांनी उपरोक्त कार्यक्रमांची नोंद घ्यावी. व निवडणूक कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/ -**
**(श्री. भागवत बिघोत (राजपूत)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**तथा मुख्याधिकारी**
**वैजापूर नगरपरिषद**